**यशोगाथा**

**(पुस्तक परीक्षण : 'देश विदेशात गाजलेल्या स्त्रिया' लेखिका - आशा परूळेकर)**



जगाच्या इतिहासात अनेक कर्तृत्ववान स्त्रिया होऊन गेल्या, आजही आहेत व भविष्यातही त्या आपल्या थोर कार्याने नवीन इतिहास घडवणार. एका स्त्री प्रकाशिकेने प्रकाशित केलेले व एका स्त्री लेखिकेने लिहिलेले हे पुस्तक. ते सुद्‌धा दहा कर्तृत्ववान स्त्रिया ज्यांनी 'मरावे परी कीर्तिरूपी उरावे' ही उक्ती अक्षरशः सार्थ केली. आशा भोसले ह्यांच्या सुमधुर आवाजाची जादू आजही आपण अनुभवतो.

या पुस्तकात राजकारण, साहित्य, कला, समाजसेवा इ. क्षेत्रांत आपले अस्तित्व स्त्री कसे सिद्‌ध करू शकते याचा संक्षिप्त परिचय लेखिकेने केलेला आहे. ॲगाथा ख्रिस्ती, आशा भोसले, बेनझिर भुट्‌टो, प्रिन्सेस डायना, इंदिरा गांधी, डॉ. मारिया मॉँटेसरी, बेगम अख्तर, हेलन केलर, मदर तेरेसा ह्या सर्वांनी जनमानसावर आपला ठसा उमटवला आहे. देशाच्या प्रगती, संस्कृती व समाजसुधारणेत या स्त्रियांनी मोलाचे योगदान दिले आहे.

स्त्री ही आपले स्त्रीत्व सांभाळून देशाचे राजकारण सांभाळू शकते. आपल्या आयुष्यात अनेक वादळे येतात व जातात, पण त्यांना कसे सामोरे जायचे हे सर्व आपण हे पुस्तक वाचताना अनुभवतो.

मेहनत, दृढनिश्चय, आपल्या अंगभूत असलेल्या गुणांचा विकास कसा करावा हे सर्व आपण या पुस्तकातून शिकतो. 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' असे आपण मदर तेरेसा यांचे वर्णन करू शकतो. सेवाव्रत व त्याग यांची त्या मूर्तीच. मारिया मॉँटेसरी यांनी मुलांना प्रभावी व यशस्वीपणे कसे शिकवावे हे जगाला दाखवून दिले. हेलन केलरने अंध, मूकबधिरांना नवी प्रेरणा दिली. नव्या पद्‌धतीने अध्ययन करण्याचा मार्ग दाखवला.

हे पुस्तक लहान मुले, पुरूष, स्त्रिया सर्वांना बोध व ज्ञानपर असे आहे. खाजगी व लौकिक आयुष्यात सुवर्णमध्य कसा साधावा हे आपल्याला या पुस्तकातून उमगते..

सर्वांनी ह्या पुस्तकाचा मनमुराद आनंद घ्यावा असे मला मनापासून वाटते.

**दर्शना प्रभूतेंडोलकर**

(’महाराष्ट्र टाईम्स’च्या सौजन्याने)